कॅम्प करूंदा.
दिनांक :— ०९.०९.२०१९

<u>प्रेसनोट</u>

लोकसेविका श्रीमती रत्नमाला जयवंतराव श्रृंगारे, वय ३७ वर्ष, तलाठी, वर्ग—३, सज्जा आसोला अतिरीक्त कार्यभार तलाठी सज्जा शिरडशहापुर, तहसिल औंढा (ना.), खाजगी इसम आनंता शंकरराव जोगदंड, वय ५४ वर्ष, व्यवसाय शेती, रा. शिरडशहापुर व लोकसेवक त्रिलोकचंद हुकुमचंद कंदी, वय ४९ वर्ष, सेवक, वर्ग—४, श्री शांती विद्यामंदीर, शिरडशहापुर, रा.जैन गल्ली शिरडशहापुर यांना लाचेची रक्कम स्विकारल्यावरून ताब्यात घेतले बाबत...

---

पिडीत तक्रारदार यांनी दिनांक ०७.०७.२०१९ रोजी तक्रार दिली होती की, त्यांचे पत्नीचे नावे असलेल्या आसोला शेत शिवारातील गट कमांक १७३ मधील शेतावर बॅकेने ट्रॅक्टर खरेदीसाठी मंजूर केलेला ७,५७,७००/— रूपयांचे कर्जाचे बोजाचा फेर मंडळ अधिकारी यांचेकडून मंजूर करून घेवून तसा सातबारा देण्यासाठी शिरडशहापुर सज्जाच्या तलाठी श्रृंगारे मॅडम हया माझ्याकडे १,०००/— रूपयांची लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार दिली होती.

त्यावरून दिनांक ०७.०७.२०१९ रोजी तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करण्यात आली असता लोकसेविका श्रृंगारे, तलाठी यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून लाचेची रक्कम १,०००/— रूपये खाजगी इसम जोगदंड यांचे मार्फतीने ठरवून ती लाचेची रक्कम १,०००/— रूपये स्विकारण्यास सहमती दिली होती. त्यावरून दिनांक ०९.०९.२०१९ रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेविका श्रृंगारे, तलाठी यांनी ती लाचेची रक्कम १,०००/— रूपये शिरडशहापुर येथिल आनंद कॉम्प्युटर सेंटर येथे लोकसेवक त्रिलोकचंद हुकुमचंद कंदी यांचे मार्फत दुपारी ४ वाजुन ८ मिनीटांनी स्विकारली. त्यावरून लोकसेविका श्रृंगारे, तलाठी, खाजगी इसम जोगदंड व लोकसेवक कंदी यांना लाचेच्या रकमेसह रंगेहाथ पकडण्यात आले आहे. तसेच पुढील कारवाई सुरू आहे.

ही कामगिरी मा. श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मा. श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षिका, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक श्री गायकवाड, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली यांनी पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, पोहेकॉ श्री अभिमन्यु कांदे, पोहेकॉ श्री विजय कुमार उपरे, पोहेकॉ श्री आढाव, पोना श्री संतोष दुमाने, पोना महारूद्रा कबाडे, पोना श्री विनोद देशमुख, पोना श्री तानाजी मुंडे, पोशि श्री अविनाश किर्तनकार, चापोना श्री सरनाईक अॅ.क.ब्युरो कार्यालय हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क.—१०६४**, दुरध्वनी क.०२४५६—२२३०५५,
**मोबाईल कमांक :—** ८८८८७१७९९९, ९९२३०४२५६५, ८१७७८१८८२५.

Scanned by CamScanner